अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २६ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३५८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## तांबोळे येथे तरुणाची विष पिऊन आत्महत्या

**सोलापूर** : एका २७ वर्षीय तरुणाने शेतात विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना तांबोळे (ता.मोहोळ) येथे घडली. शरद पांडुरंग जाधव (वय २७ रा.तांबोळे ) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने शुक्रवारी दुपारच्या सुमारास स्वतःच्या शेतात विष प्राशन केले होते. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून प्रवीण जाधव (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान तो आज सोमवारी सकाळी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिस झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## वडवळ येथे घरफोडी; एक लाखाचा ऐवज केला लंपास

**मोहोळ** : वळवळ येथे चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून सोन्याच्या दागिन्या सह रोख रक्कम असा एक लाखाचा ऐवज लंपास केला तानाजी कलशेट्टी हे वडवळ येथील घराला कुलूप लावून बाळे येथे असणाऱ्या त्यांच्या घरी लक्ष्मी असल्याने गेले होतेफ२४ सप्टे रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे वडील वडवळ येथे आले चोरट्याने त्यांचे घरफोडल्याचे दिसले. घरातील लाकडी पेटी गायब झाली होती ती इतरत्र शोधाशोध केली असता महेश शिवपुजे यांच्या शेतात चिंचेच्या झाडाखाली दिसून आली. ती तपासली असता त्यामध्ये दीड तोळ्याची सोन्याची अंगठी अंदाजे किंमत ७५ हजार रुपये व रोख रक्कम २५ हजार रुपये दिसून आले नाही.या घटनेचा तपास पो.स.ई. शेख हे करित आहेत.

# संघर्ष मिटेना, तोडगा निघेना ठाकरे गटाला ‘देव’ भेटेना

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या शिंदे-ठाकरे सत्ता संघर्षावर सोमवारच्या सुनावणीत कुठलाच तोडगा निघाला नाही.दोनही गटात कायदेशीर बाबींवर जोरदार खडाजंगी झाली. सर्व ३४ याचिकांवर एकत्रित सुनावणी घ्या, अशी मागणी ठाकरे गटाने लावून धरली तर ठाकरे गटाच्या या मागणीला शिंदे गटाने कडाडून विरोध केला. दोन्ही गटांचा युक्तिवाद ऐकून घेऊन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पुढची सुनावणी ही १३ आक्टोबर रोजी ठेवली आहे. एकंदरीत चित्र पाहाता यावर इतक्यात तोडगा निघून अपात्रतेविषयीचा निर्णय लवकर लागणे कठीण असल्याचे सांगण्यात आले. कागदपत्रे तपासणी, साक्ष नोंदवणे व उलट तपासणी ही प्रक्रिया तीन महिने चालण्याचा अंदाज आहे. त्यामुळे अंतिम निर्णय व्हायला नवे वर्ष उजाडेल, असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. आपल्या सत्तेला सुरूंग लावणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खुर्ची खेचण्याची घाई लागलेल्या ठाकरे गटाला या सुनावणीतही ‘देव’ नाही भेटला.**

शिंदे गटातील १६ आमदार अपात्रता प्रकरणाची मुंबईतील विधान भवनात सुनावणी दुपारी साडेतीनच्या सुमारास झाली. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे वकील अनिलसिंह साखरे, तर ठाकरे गटाकडून देवदत्त कामत यांनी युक्तिवाद केला.

ठाकरे गटाकडून विधानसभा अध्यक्षांना पत्र दिले होते, त्यात कागदपत्रांची पुन्हा छाननी करण्यात यावी तसेच दोन्ही गटाला कागदपत्रे देण्यात यावीत, असे मागील सुनावणीच्या वेळी सांगितले होते. त्यामुळे कागदपत्रांची पुन्हा एकदा छाननी केली जाईल. सुमारे ३४ याचिकांवरील सुनावणी पुन्हा एकदा एकत्रित घेण्यात यावी, त्यामुळे वेळ वाचेल आणि लवकरात लवकर निर्णय होईल, अशी मागणीही कामत यांनी केली होती. त्यामुळे त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी देण्यात आला होता.

दरम्यान, नार्वेकर यांच्यासमोरसुनावणीलासुरुवात होताच ‘सर्व ३४ याचिकांवर एकत्र सुनावणी घ्यावी,’ अशी मागणी ठाकरे गटाचे वकील कामत यांनी केली. याचिका एकत्रित का केल्या जात नाहीत? अशी विचारणा त्यांनी केली.

मात्र, त्यास शिंदे गटाकडून विरोध दर्शविण्यात आला. वैयक्तीकरित्या आमदारांचे



## आमदार अपात्र सुनावणी पुन्हा लांबली

### ठाकरे गटाची चलाखी

आमदार अपात्रता सुनावणी प्रकरणात ठाकरे गटाने शिंदे गटाच्या विरोधात आणखी एक चाल रचली. ठाकरे गटाने अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केले, ज्यामध्ये या पाच मुद्द्यांचा समावेश आहे. त्यामुळे या आधारावर एकत्रित सुनावणी घेऊ शकते. या प्रकरणात उलट तपासणी करण्याची गरज नाही असा युक्तिवाद ठाकरे गटाने मांडला. ठाकरे गटाने मांडलेले पाच मुद्दे राज्यपालांनी बहुमत सिद्ध करण्यासंदर्भात सत्ताधाऱ्यांना पत्र दिलं. मुख्यमंत्री यांनी ३० जूनला शपथ घेतली. व्हीपच्या नियुक्ती बाबत सुप्रीम कोर्टाने आक्षेप घेतला. दोन्ही गटाकडून कागदपत्रांची देवाणघेवाण झाली आहे. दोन्ही गटाची कागदपत्रे विधानसभा अध्यक्षांकडे आहेत. सुप्रीम कोर्टातल्या सुनावणीच्या निकालाची कागदपत्रे उपलब्ध आहेत. हे मुद्दे लक्षात घेऊन उलट तपासणी न करता वेळ काढूपणा न करत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती ठाकरे गटाकडून करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्षांसमोर सुरू असलेली सुनावणी लाईव्ह दाखवण्याच्या मागणीबाबत विधानसभा अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली

### नवे वर्ष उजाडणार...

ठाकरे गटाकडून सातत्याने मागणी करण्यात येत असलेल्या सर्व याचिकांच्या एकत्रित सुनावणीवर १३ तारखेला सुनावणी होणार आहे. दरम्यान, या संभाव्य वेळापत्रक, कागदपत्रे तपासणी, त्याचबरोबर साक्ष नोंदवणे, उलट तपासणी मुद्द्यांचा समावेश असल्याने या प्रक्रियेत तीन महिन्यांचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन असल्याने त्या दरम्यानच्या कालावधीत सुनावणी होण्याची शक्यता धुसर असल्याने आता जानेवारी २०२४ मध्ये निर्णय येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अपात्रतेसंदर्भात म्हणणे जाणून घेतले पाहिजे.

या सर्व याचिकांवर स्वतंत्ररित्या सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी शिंदे गटाने केली. त्या १६ आमदारांना स्वतंत्र पुरावा द्यायचा असल्याने त्याची वेगवेगळी सुनावणी घ्यावी, असा मुद्दा शिंदे गटाने लावून धरला. याचिकांमध्ये त्रुटी असून या सगळ्या याचिका संदर्भात पुरावे आम्हाला सादर करायचे आहेत आणि त्यामुळे सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी घेऊ नये, असा युक्तिवाद शिवसेना शिंदे गटाकडून करण्यात आला.

या सर्व ३४ याचिकांवर स्वतंत्ररित्या सुनावणी घेण्यासाठी वेळ लागू शकतो. या प्रकरणाच्या निर्णयासाठी विधानसभा अध्यक्षांनी आजच सांगावे. या प्रकरणावरील निर्णय देण्यासाठी किती वेळ लागू शकतो, याबाबतचे वेळापत्रक जाहीर करावे, असा युक्तिवाद कामत यांनी केला.



## आरक्षणासाठी धनगर समाज आक्रमक
## मंगळवेढ्यात मेंढ्यांसह रास्तारोको आंदोलन

**सुराज्य/सोलापूर**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात धनगर आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. यातच आता मंगळवेढा तालुक्यात सकल धनगर समाजाच्यावतीने धनगर आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी, यासाठी मेंढ्यासह रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान 'बीआरएस'चे नेते भगीरथ भालके यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. धनगर आरक्षणात 'र' चे 'ड' करून समाज व समाजातील भविष्याच्या पिढीचे मानगूट मुरगाळण्याचे काम नेते मंडळींनी केले आहे, असा आरोप भगीरथ भालकेंनी केला.

पंधरा दिवसांपूर्वी आरक्षणासाठी मराठा समाज रस्त्यावर उतरला होता. आता आरक्षणाच्या मुद्द्यावरून धनगर समाज देखील रस्त्यावर उतरलेला आहे. बहुजन समाजाला राज्यकर्ते गृहीत धरून चालत असेल तर भविष्यातील पिढीसाठी यापेक्षाही तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा भालकेंनी दिला. मी जरी आज भाजपमध्ये असलो तरी आधी समाज नंतर पक्ष ही माझी भूमिका आहे. त्यामुळे समाजाचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे, असं मत माऊली हळणवर यांनी मांडले.

## सतराशे साठ कारभारी झाल्याने जिल्हा परिषद घाण झाली : आ. संजयमामा

**सोलापूर** : जिल्हा परिषदेचा पूर्वीचा कारभार आणि आताच्या कारभार यामध्ये जमीन अस्मानाचा फरक झाला आहे. सध्या झेडपीत सतराशे साठ कारभारी झाले आहेत त्यामुळे झेडपी घाण झाली आहे, असे मत आमदार संजय मामा शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

आ. संजयमाम शिंदे हे सोमवारी जिल्हा परिषदेत बऱ्याच दिवसांनी काही कामानिमित्त आले होते, त्यावेळी सायंकाळी जिल्हा परिषदेच्या बाहेर पडताना अचानक संजय मामा आणि पत्रकारांची भेट झाली, त्यावेळी त्यांनी वरील वक्तव्य केले. पूर्वी झेडपीमध्ये जे वातावरण होते, कामाच्या पद्धती होत्या त्यात बदल झाला आहे. आता झेडपीकडे येण्याची इच्छाच होत नाही .मामा आपण खूप दिवसांनी झेडपी ला भेट दिली असे



पत्रकारांनी विचारले, असता ते म्हणाले की कशाला यायचे झेडपी मध्ये सतराशे साठ कारभारीच झालेत. त्यामुळे जिल्हा परिषद गहाण झाली आहे, असे म्हणून घाई गडबडीत गाडीत बसत संजय मामा निघून गेले.

## रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : बार्शी रेल्वे स्थानकातील दोन नंबर प्लॅटफॉर्म जवळ रेल्वेच्या धडकेने साकिब खान नावाचा तरुण गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाला. काल रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. त्याला कुर्डूवाडी रेल्वेच्या पोलिसांनी बार्शी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद कुर्डूवाडी रेल्वे पोलीसात झाली. मयत कुठे राहणार हे मात्र समजले नाही.

## पत्रकारांविषयी वादग्रस्त विधान; बावनकुळेंवर टीकेची झोड

**सुराज्य/मुंबई**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विधानामुळे खळबळ उडाली आहे. भाजपाविरोधात पत्रकारांनी बातम्या छापू नयेत, म्हणून पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांना चहा प्यायला न्यावे, ढाब्यावर जेवायला न्यावे, असे विधान केल्यामुळे वृत्तपत्र क्षेत्रातून तसेच विरोधी पक्षांकडून बावनकुळेंसह भाजपावर टीका केली गेली.

अहमदनगरच्या सावेडी येथे पदाधिकारी आणि बूथ कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत बावनकुळे यांनी पत्रकारांविषयी वरील वक्तव्य केले होते. या वादग्रस्त विधानवर त्यांच्यावर सर्वच पक्षांनी टिका केली.

दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बावनकुळेंची पाठराखण केली. तसेच त्यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये. बावनकुळे व्यंगात्मक बोलले आहेत. अशी प्रतिक्रिया दिली.

## दौंडमधून विसर्ग घटला आज वाढण्याचा अंदाज



**सुराज्य/सोलापूर**

उजनी धरण परिसरात तसेच पुणे जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला झाल्याने दौंड येथून उजनीत येणारा विसर्ग सोमवारी सायंकाळी कमी झाली. मात्र पुणे जिल्ह्यातील वरच्या धरणांमधून पाणी सोडल्यामुळे त्याचा लाभ उजनीला होणार आहे.त्यामुळे मंगळवारी सकाळपासून दौंडमधून विसर्ग वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सोमवारी सकाळी दौंडमधून साडे नऊ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.दुपारनंतर त्यात घट झाली. सायंकाळी साडे सात हजार क्युसेकचा प्रवाह होता.धरणातील पाण्याची पातळी २१ टक्के झाली होती परंतु सोमवारच्या विसर्गामुळे ही पातळी पुन्हा २३ टक्के झाली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**सुराज्य/सोलापूर**

लग्नाचे आमिष दाखवून पुणे राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेलमध्ये नेऊन अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अजित आप्पासाहेब पाटील (रा. होटगी रोड,सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

पीडित तरुणी व संशयित आरोपी या दोघांची ओळख होती.त्या ओळखीतून त्याने त्या तरुणीस स्वतःच्या बुलेटवर नेऊन निवांत बोलायचे आहे असे सांगून पुणे राष्ट्रीय महामार्गावर एका लॉज मध्ये नेले होते.तेथे तिच्या इच्छेविरूध्द अत्याचार केला.

त्यानंतर दोन आठवड्यांनी त्याच ठिकाणी नेऊन अत्याचार केला.लग्नाबद्दल विचारणा केली असता त्या तरुणाने उडवाउडवी केली. त्या तरुणीने पुन्हा त्या मुलाकडे लग्नाची चौकशी केली असता त्याच्या घरच्यांनी, मामांनी तुमचे लग्न झाल्यास मी त्या मुलास घरात घेणार नाही असे धमकाविले.

त्यामुळे त्या मुलीने आई-वडिलांच्या मदतीने विजापूर नाका पोलीस ठाण्यात तरुणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




**बाप्पा, आता हे कायमचेच झाले आहे!**

कल्याण
368-78-990
मुंबई
790-69-469

### शारदीय महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात
# सोलापूर-तुळजापूर महामार्ग तीन दिवस बंद राहणार

**सुराज्य/धाराशिव**

**श्री क्षेत्र तुळजापूर (जि. धाराशिव) येथील कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान तुळजापूर- सोलापूर महामार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोमवारी विभागनिहाय यंत्रणेकडून झालेल्या तयारीचा आढावा घेतला.त्यात हा निर्णय घेण्यात आला.**

तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव ६ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत पार पडणार आहे. यात्रा काळात देशभरातून देवीदर्शनासाठी येणार्या लाखो भाविकांची मोठी गर्दी होते. त्यादृष्टीने मागील दोन महिन्यांपासून जिल्हा प्रशासन, मंदिर प्रशासन व तुळजापूर नगरपालिका प्रशासन यात्रेच्या तयारीत व्यस्त आहे. आढावा बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, उपविभागीय अधिकारी योगेश खरमाटे, मंदिर संस्थानचे व्यवस्थापक सोमनाथ माळी, अरविंद बोलंगे, नायब तहसीलदार संतोष पाटील, पोलिस निरीक्षक गजानन घाडगे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांनी पत्रकारांना सांगितले, की नवरात्र महोत्सवाची प्रशासन पातळीवर संपूर्ण तयारी झालेली आहे. यात्रेच्या काळात सोललेले नारळ, तेल, प्लास्टिक पिशव्या विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. भाविकांना मंदिरात जाण्यासाठी घाटशीळ पार्किंग येथून प्रवेश दिला जाणार आहे व बाहेर पडण्यासाठी मातंगी मंदिर, जिजाऊ महाद्वारमधून सोडण्यात



येणार आहे. यात्रा कालावधीत बोगस मंडळींकडून भाविकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, यासाठी तिन्ही पुजारी मंडळांकडून पुजार्यांची यादी मागविण्यात येणार आहे. यात्रा कालावधीत हंगामी व्यापार्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते कमान वेस या मार्गावर जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अतिक्रमणविरोधी पथक तैनात करण्यात आले आहे.

कर्नाटक व इतर राज्यातील बसगाड्यांसाठी त्यांना पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेच्या बंदोबस्तासाठी येणार्या पोलिस व इतर कर्मचार्यांसाठी धर्मशाळा व शहरातील काही जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरात २१ ठिकाणी प्रथमोपचार केंद्राची व्यवस्था असणार आहे. तुळजापूर-सोलापूर मार्गावरील वाहतूक गर्दीमुळे २७ ते २९ ऑक्टोबरदरम्यान बंद राहणार आहे. शहरात येणार्या भाविकांच्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येत असून ३० हजार वाहने थांबतील, अशी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.त्या-त्यामार्गावरदिशादर्शक नकाशे, डिजिटल फलके लावण्यात येणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने १०० सीसीटीव्ही कॅमेरा, इतर राज्यातील भाविकांना समजण्यासाठी त्या-त्या भाषेत स्पीकर वरून माहिती सांगण्यात येईल, महिलांची छेडछाड रोखण्यासाठी दामिनी पथक तैनात करण्यात येणार आहे, असे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.